VOL- XI ISSUE- VIII AUGUST 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# मनोहरभाई पटेल - जीवन आणि कार्य : एक आढावा

**प्रा.डॉ.अनिल बोपचे**
मराठी विभाग प्रमुख
डॉ.अरुण मोटघरे महाविद्यालय कोंढा-कोसरा,ता-पवनी, जि-भंडारा
पिन कोड - 441908
ईमेल- dranilbopche2010@gmail.com

**सारांश :**

*गोंदिया, भंडारा क्षेत्रातील एक दैदिप्यमान तारा म्हणून ज्यांची ख्याती आहे, शिक्षण क्षेत्रात ज्यांचं सर्वत्र नाव आहे, असे ते कैलाशवासी मनोहरभाई पटेल अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे धनी होते. आपण जेथे राहतो त्या परिसराचा - त्या क्षेत्राचा विकास करणे, त्या धरेवरील लोकांचा उद्धार करणे हेच त्यांचे दायित्व ठरले. नेहमी त्यांनी जनतेच्या हिताचा विचार केला. त्यामुळे लोकांनी त्यांना भरभरून प्रेम दिले. नेहमी जनकल्याणाचा ध्यास बाळगणे किंबहुना ते कृतीत आणणे यास्तव ते कार्यतत्पर राहत असत. हे विशेषत्व त्यांच्या रोमारोमात ठासून भरलेले होते.*

**प्रस्तावना:**

मनोहरभाई पटेल हे अफलातून व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी केलेले कार्य अचंबित करणारे होते. शून्यातून विश्व उभं करणं भल्याभल्यांना जमत नाही; परंतु मनोहरभाई पटेलांनी हे करून दाखवलं. स्वतः त्यांनी आपल्या आयुष्याला वळण दिलं .किंबहुना त्यांनी आपल्या जीवनाची दिशा ठरवली. त्यामुळेच त्यांच्या जीवनाला वेगळी कलाटणी मिळाली. त्यांनी आपल्या जीवनात व्यवसाय, राजकारण व शिक्षण या क्षेत्रांना महत्त्व दिले. त्यामुळेच त्यांना या क्षेत्रात क्रांती करता आली. मनोहरभाई पटेल हे कार्यतत्पर व्यक्तिमत्त्व होते.त्यांचं संपूर्ण आयुष्य जनसेवेत गेलं. जनसेवा हीच ईश्वरसेवा होय या मूलमंत्रावर त्यांचा गाढ विश्वास होता.

जीवन आणि कार्य:

मनोहरभाई पटेल यांचा जन्म दि. 09 फेब्रुवारी 1906 रोजी गुजरात राज्यातील खेडा जिल्ह्याच्या 'नडियाद' या गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या आई-बाबांची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती असल्यामुळे ते फक्त चौथ्या वर्गापर्यंत शिक्षण घेऊ शकले. शिक्षण सोडल्यानंतर बालपणातच त्यांना उदरनिर्वाहासाठी नडियाद मध्ये विविध कामे करावी लागली. वयाच्या पंधराव्या वर्षी म्हणजे 1921 मध्ये त्यांनी नडियाद सोडले व मध्य प्रदेशातील जबलपूर या शहरात आपले बस्तान मांडले. जबलपूरमध्ये त्यांनी एका बिडीच्या कंपनीत काम करायला सुरुवात केली. अत्यंत हलाखीची परिस्थिती असल्यामुळे त्यांनी तेथे मिळेल ते काम केले.

मनोहरभाई पटेल वयाच्या 24 व्या वर्षी म्हणजेच 1930 मध्ये तत्कालीन मध्य प्रांत आणि बेरार (सी. पी. अँड बेरार) स्थित गोंदिया या शहरात आले व तेथेच स्थायी झाले. सुरुवातीला त्यांनी त्यांच्या काकांच्या मेसर्स सी. जे. पटेल अँड कंपनीत काम केले. पुढे त्यांनी ही कंपनी नावारूपास आणली. अत्यंत हलाखीचं जीवन जगत, आलेल्या संकटांवर मात करत मनोहरभाई पटेल यांनी मार्गक्रमण केलं. गुजरातमधील 15 व्या वर्षांपर्यंतचं आयुष्य, त्यानंतरचं मध्यप्रदेशातील जबलपूरमधील नऊ वर्षांचं संघर्षमय वास्तव्य आणि त्यानंतरची गोंदिया या सी.पी. अँड बेरार स्थित व नंतरच्या महाराष्ट्रात विलीन झालेल्या शहरातील शेवटच्या घटकापर्यंतची गरुडभरारी हे सर्व बघता मनोहरभाईंचे आयुष्य, जीवन अद्भुत होतं असं वाटतं. त्यांनी आपल्या जीवनाला कशी यशस्वी कलाटणी दिली, आलेल्या संधीचं कसं सोनं केलं, हे सर्व चमत्कारिक आहे, विस्मयकारक आहे. शून्यातून विश्व उभं करण्याची ताकद फार कमी

लोकांमध्ये असते. त्यातील एक म्हणजे मनोहरभाई पटेल आहेत.

कै. मनोहरभाई पटेल हे फक्त चौथ्या वर्गापर्यंत शिक्षण घेऊ शकले होते. त्यांना शिक्षणाबद्दल अपार आस्था होती. परंतु ते आपल्या आई-वडिलांच्या कमकुवत अशा आर्थिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षण घेऊ शकले नव्हते. शिक्षणाबद्दलची आंतरिक तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. समाजाप्रती त्यांचं काहीतरी दायित्व आहे असे त्यांना नेहमी वाटत असे. याच जाणिवेतून त्यांनी पत्नी शांताबेन यांच्या प्रोत्साहनामुळे 1958 मध्ये 'गोंदिया शिक्षण संस्था' चे रोपटे गोंदिया या शहरात लावले. सुरुवातीला त्यांनी फक्त गोंदियात एक महाविद्यालय उघडले. या महाविद्यालयात त्यावेळेस फक्त 56 विद्यार्थी होते. या शिक्षणरूपी व्यवस्थेची पताका अधिक प्रकर्षाने गतिमान व्हावी म्हणून त्यांनी 1961 यावर्षी भंडारा - गोंदिया (तत्कालीन भंडारा) जिल्ह्यात एकाच वेळी 23 शाळा उघडल्या. हा त्या काळातील शिक्षण क्षेत्रातील एक विक्रमच होता. पुढील काळात योग्य वेळ येताच त्यांनी अनेक शाळा इमारतीसह जिल्हा परिषदेला हस्तांतरित केल्या. यातून मनोहरभाई पटेल यांचा दानशूरपणा प्रकर्षाने दिसून येतो. किंबहुना माणुसकीची कणव असलेला हा महामानव समाजाप्रती किती सजग होता हेही दिसून येते. शिक्षणाबद्दलची आस्था बाळगणं हे त्यांच्या स्वभावातील विशेष गुण होते. या क्षेत्रातील कुणीही शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी ते सतत झटत असत. त्यांनी आपल्या हयातीत शेवटपर्यंत शिक्षणाची गंगा प्रवाहीत ठेवली. त्यामुळे ते शिक्षणाची गंगा प्रवाही ठेवणारे खरे भगीरथ ठरले.

कै. मनोहरभाई पटेल यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सुद्धा सहभाग घेतला होता. ते महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, जयप्रकाश नारायण या थोर पुढारींच्याआणि इतर स्वातंत्र्यसंग्राम सेनानींच्या संपर्कात आले होते. त्यांनी या स्वातंत्र्यलढ्याची गोंदिया क्षेत्रातून धुरा सांभाळली होती. स्वातंत्र्योत्तर काळात इंदिरा गांधी, मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण व इतर नेत्यांसोबत त्यांचे सलोख्याचे संबंध होते. त्याचप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कामठा आश्रम चे संत लहरी बाबा यांचेही आशीर्वाद त्यांच्यावर होते. मनोहरभाई पटेलांवर गांधीजींच्या विचारसरणीचा मोठा प्रभाव होता. त्यांनी गांधीतत्त्वप्रणाली आत्मसात केली होती. याचेच पर्यावसान ते नेहमी खादीचे वस्त्र वापरत असत. त्यांची काँग्रेस पक्षावर मोठी निष्ठा होती. त्यामुळेच ते या पक्षाचे अत्यंत सक्रिय सदस्य बनले. त्याचप्रमाणे ते अखिल भारतीय काँग्रेस समिती, विदर्भ क्षेत्र काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे कोषाध्यक्ष सुद्धा बनले. मनोहरभाई पटेल आपला व्यवसाय निष्ठेने सांभाळत असत व तेवढ्याच निष्ठेने ते राजकारणातही भाग घेत असत. गोंदिया शहराचा विकास करणे हे त्यांचे स्वप्न होते. ते गोंदियासाठी रात्रंदिवस झटत असत. याचीच परिणती गोंदियातील जनतेने त्यांना 1946 मध्ये नगरसेवक म्हणून निवडून दिले. काँग्रेस पक्षातील सर्व नगरसेवकांनी गोंदिया नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून त्यांना एकमताने मान्यता दिली. काँग्रेस पक्षावरील निष्ठा व सर्वसाधारण लोकांबद्दलची आस्था त्यांच्या रोमारोमात भरलेली होती. त्यामुळेच ते गोंदिया नगरपालिकेच्या अध्यक्षपदावर 24 वर्षांपर्यंत आरूढ होते. 1946 पासून तर त्यांचे निधन होईपर्यंत म्हणजे 1970 पर्यंत त्यांनी कारकीर्द सांभाळली. मनोहरभाई पटेलांचं आयुष्य खूप व्यस्त होतं. व्यवसाय सांभाळून राजकारण करणे ही तारेवरची कसरत ते लीलया पेलत असत. आपला भारत देश इंग्रजांपासून स्वतंत्र झाल्यावर पहिली विधानसभा निवडणूक 1951 मध्ये घेण्यात आली. मनोहरभाई पटेल हे 1951 मध्ये तत्कालीन राज्य 'मध्य प्रांत& बेरार'च्या पहिल्या विधानसभेचे सदस्य (आमदार) म्हणून काँग्रेस पक्षातर्फे निवडून आले. त्यांनी समाजवादी पक्षाच्या गोपालनारायण बाजपेयी यांना पराभूत केले. ( 1956 मध्ये मध्यप्रदेश राज्यात 'मध्य प्रांत आणि बेरार'चं विलीनीकरण करण्यात आलं.) 1960 मध्ये राज्यांच्या पुनर्गठनानुसार गोंदिया विधानसभा क्षेत्र महाराष्ट्र राज्यात आलं. या 1960 मधील विधानसभा निवडणुकीत पुन्हा मनोहरभाई पटेल मोठ्या मताधिक्याने निवडून आलेत. लोकांनी त्यांच्यावर विश्वास टाकला. त्यांची कर्तव्यतत्परता या कामी आली. त्यांनी जनतेसाठी भरभरून कार्य केले.

गोंदिया आणि भंडारा या परिक्षेत्राचा विकास करणे हा मनोहरभाईंचा उदात्त हेतू होता आणि त्याच दिशेने त्यांची वाटचाल सुरू होती. ज्याप्रमाणे शिक्षणाचा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून त्यांनी शिक्षणाची गंगा प्रवाहीत केली; त्याचप्रमाणे सिंचनाच्या क्षेत्रातही त्यांनी मोठे योगदान दिले. देवरी तालुक्यात सिरपूरजवळ बाघनदीवर तत्कालीन महाराष्ट्र व मध्यप्रदेश सरकारच्या संयुक्त विद्यमाने 'मनोहर

VOL- XI ISSUE- VIII AUGUST 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

सागर जलाशय'ची निर्मिती करण्यात आली. उद्देश हाच की या परिक्षेत्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी मुबलक स्वरूपात पाणी मिळेल व हजारो एकर जमीन सिंचनाखाली आल्याने तेथील शेतकरी समृद्ध बनेल. या उद्देशाचे पुढील काळात परिणाम दिसून आले. या जलाशयामुळे या क्षेत्रातील शेतकरी समृद्ध बनला. मनोहरभाईंनी हे जलाशय व्हावे म्हणून मोठे जिकिरीचे प्रयत्न केले होते. ते तत्कालीन भंडारा जिल्ह्याला सुजलाम् - सुफलाम् करू पाहत होते. तत्कालीन भंडारा जिल्हा म्हणजे मालगुजारी तलावांचा जिल्हा. या मालगुजारी तलावातील पाण्याच्या योग्य विनियोग व्हावा असा सल्ला ते मालगुजारांना देत असत. उद्देश हाच की या मालगुजारी तलावांच्या माध्यमातून सिंचन क्षेत्रात क्रांती करता येईल.

दि.17 ऑगस्ट 1970 रोजी महामानव मनोहरभाई पटेल अनंतात विलीन झाले. 'मनोहरभाई पटेलांच्या कार्यांना कधीही विसरता येणार नाही' असे उद्गार तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी याप्रसंगी काढले. मनोहरभाई पटेल यांचे पूर्ण राजकीय सन्मानाने अंत्यसंस्कार करण्यात आले. ' न भूतो न भविष्यती 'असा महामानव कैलाशात स्थिरावला, असेच म्हणता येईल.

**निष्कर्ष :**

कै. मनोहरभाई पटेल यांची दृष्टी अष्टपैलू स्वरूपाची होती. व्यवसाय असो की शिक्षण असो की सिंचन असो या सर्व क्षेत्रात त्यांनी आमुलाग्र बदल केले. या अनुषंगाने त्यांनी गोंदिया, भंडारा क्षेत्रात मोठी क्रांती केली. त्यांनी जे कष्ट उपसले होते, जो संघर्ष केला होता तो इतरांच्या वाट्याला येऊ नये अशी त्यांची मनस्वी भावना होती. ते गोरगरिबांचे तारणहार होते. ते या धरेवर अवतरलेले दैवी पुरुष होते. त्यांच्या कर्तृत्वांना भंडारा- गोंदिया क्षेत्रातील जनता कधीही विसरू शकणार नाही. आजही कै. मनोहरभाईंचे गुणगान सर्वत्र गायले जाते.

**संदर्भ :**

१) साप्ताहिक 'बेरार टाईम्स' , संपादक - खेमेंद्र कटरे , दि. 09 फेब्रुवारी 2021,पृष्ठ क्र.1.
२)'विकासनामा' सामाजिक उत्कर्षाचा... अतुलनीय कर्तृत्वाचा...!, संपादक - राजेश खंडेलवाल, प्रकाशक- अध्यक्ष, सिटीझन स्पोर्टस् सोसायटी, गोंदिया, प्रथम आवृत्ती दि. 17 फेब्रुवारी 2014.
३) प्रस्तुत रिसर्च पेपरशी संबंधित आंतरजालवरील मजकूर.